Gaavmat

www.gaavmat.com

# गावमत

To,

If undeliverd, please return to

WEEKLY GAAVMAT
Office : Near Police Station Badnapur
Tq.Badnapur Dist Jalna -431202 (Maharastra)
Contact Us: 9923307786,9421947786

❍Volume No 09 ❍ Issue 47 ❍ Monday Date 22-08-2022To 28-08-2022 ❍Marathi Weekly ❍ Jalna Price 2/- ❍Pages 4

# मागून आले काय,मंत्री झाले काय...-संजय शिरसाटांनी बोलून दाखवली नाराजी



औरंगाबाद(प्रतिनिधी)-शिवसेनेत बंडखोरी केल्यानंतर बंडखोर आमदार संजय शिरसाटांनी एकनाथ शिंदेंचं समर्थन करत ठाकरे कुटुंबावर जोरदार हल्ला चढवला. अगदी त्यांच्या कार्यालयातून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा फोटोही काढला. मात्र, शिंदे-फडणवीस सरकारच्या मंत्रीमंडळ विस्तारात संजय शिरसाटांना संधी मिळाली नाही. यानंतर शिरसाट नाराज असल्याची जोरदार चर्चा रंगली. आता स्वतः संजय शिरसाट यांनी सूचक वक्तव्य करत आपली नाराजी व्यक्त केली आहे.

संजय शिरसाट म्हणाले, ङ्कमी अतुल सावेंच्या वडिलांसोबत काम केलं आहे. त्यांच्या वडिलांसोबत काम करताना अतुल सावे राजकारणात येतील असं मला कधी वाटलं नव्हतं. परंतु राजकारणात आला काय, मंत्री झाला काय राज्यमंत्री झाला काय, कॅबिनेट मंत्री झाला काय, सगळंच झालंय.ङ्क

ङ्कसध्या ज्येष्ठतेचं कुठं काही राहिलंच नाहीङ्क

ङ्कअरे आमच्याकडेही पाहत जा. सध्या ज्येष्ठतेचं कुठं काही राहिलंच नाही असं वाटायला लागलं आहे,ङ्क असं म्हणत संजय शिरसाटांनी खोचक टोला लगावला. यावेळी सभेत एकच हशा पिकला. यातून शिरसाटांनी आपली नाराजी अप्रत्यक्षपणे भाजपा मंत्र्यासमोरच बोलून दाखवली आहे.

मी तर काही नसताना सगळया महाराष्ट्रात टीव्हीवर दिसतो

संजय शिरसाट पुढे म्हणाले, ङ्कमाझ्या गल्लीत कचरा उचलला जातो की नाही, माझ्या परिसरात लाईट लागल्या की नाहीत अशा मुलभूत गरजा नागरिकांच्या आहेत. हा त्याला शिव्या देतो, तो याला शिव्या देतो. मला तर खूप कंटाळा येतो. मी तर काही नसताना सगळया महाराष्ट्रात टीव्हीवर दिसतो.






शिवचैतन्य दहीहंडी महोत्सव च्या वतीने आयोजित दहीहंडी च्या कार्यक्रमात जालनेकरांनी रेकॉर्ड ब्रेक प्रतिसाद दिला यावेळी केंद्रीय रेल्वेमंत्री खासदार रावसाहेब पाटील दानवे माजी राज्यमंत्री अर्जुनरावजी खोतकर आमदार संतोष दानवे चित्रपट अभिनेत्री उर्मिला कोठारे बाजार समितीचे उपसभापती भास्कर आबा दानवे प्रतीक भैया दानवे यांच्यासह हजारोच्या संख्येने पुरुषांची व महिलांची उपस्थिती होती छाया अनिल व्यवहारे

# मुख्याधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर लक्कडकोट येथील उपोषण मागे

जालना (प्रतिनिधी) : जालना शहरातील मध्यवर्ती परिसरात असलेल्या लक्कडकोट येथील नागरी समस्या सोडविण्याकरिता दि. 15 ऑगस्टला येथील रहिवाश्यांच्यावतीने उपोषण सुरु करण्यात आले होते.

मात्र, समस्या सोडविण्याचे ठोस आश्वासन मिळाल्याने हे उपोषण मागे घेण्यात आले असल्याचे उपोषणकर्ते शेख सईद शेख नवाब यांनी सांगीतले.

लक्कडकोट, कादरीया मस्जिद, नुरानी मस्जिद येथे ऐतिहासिक दर्गा आहे. येथील रहिवाश्यांना नगर पालिकेच्या हलगर्जीपणामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

## उपोषणकर्ते शेख सईद शेख नवाब यांची माहिती

प्रभाग क्रमांक 7 मधील अनेक दिवसांपासून रस्ते, नाल्या, नळ, लाईटचे खांब यांचे काम झालेले नाही. नळाला 15-15 दिवसाला दुषित पाणी येते. सार्वजनिक शौचालय नाही. त्यामुळे स्त्रियांना मोकळया जागेमध्ये शौचालयास जावे लागते. नगरसेवक आश्वासन देवून मोकळे होतात. प्रत्यक्षात कुठलेही काम होत नाही. लक्कडकोट ते देहेडकरवाडी येथील रस्त्यांची पूर्ण चाळणी झालेले आहे व मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. या खड्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे जिवीत हानी होऊ शकते. याचे उदाहरण द्यायचे झाल्यास कन्हैय्यानगर येथे रस्त्यामुळे अपघात झाले व तो व्यक्ती मरण पावले हे आहे. घाणीमुळे वार्डातील मुले बिमार पडत आहेत. या समस्या सोडविण्याकरिता 15 ऑगस्टला लक्कडकोट येथील नागरिकांनी उपोषण करुन निवेदन देण्यात आले.या उपोषणामध्ये शेख सईद शेख नवाब, सलिम लोहार, अफसर भाई, रईस भाई, चाँद चिचा, सरफराज खान, अतीक शेख, सय्यद रहिम, ईम्रान भाई, शेख जाकीरभाई, शेख फेरोज, सईद मामू, दिलीप शेजूळ, शेख समिर, शेख अजीम, सय्यद अकरम, सय्यद अकरम, शेख शाहेद, शेख ईम्रान, मो. शोऐब, शेख हमीद मामू, डॉ. भोडोने, शेख ईब्राहिम, शे, रिजवान आदींची उपस्थिती होती. मात्र, मुख्याधिकारी संतोष खांडेकर यांनी 7 दिवसाच्या आत समस्या सोडविण्याचे आश्वासन आम्हाला दिल्यामुळे उपोषण मागे घेण्यात आले.

# देशाने राजीव गांधी यांच्या प्रगतिशील विचारामुळे तंत्र विज्ञानामध्ये मोठी प्रगती केली:आ.गोरंट्याल

जालना (प्रतिनिधी) : देशामध्ये स्व. राजीव गांधी यांनी तंत्र विज्ञान प्रणाली स्थापित केल्यामुळे भारत देश जगाच्या पाठीवर महान बनला आहे. युवकांनी राजीव गांधी यांचे प्रगतिशील विचार अमलात आणावे असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा आ. कैलास गोरंट्याल यांनी केले आहे.



जालना शहर आणि तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त शनिवार रोजी प्रितिसुधाजीनगर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री गोरंट्याल हे बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलतांना आ. कैलास गोरंट्याल म्हणाले की, आज देशामध्ये लाखोंच्या संख्येने सुशिक्षीत बेरोजगारांची संख्या वाढलेली आहे. युवकांच्या हाताला काम नाही. खऱ्या अर्थाने पाहिले तर देशातला युवक हा सैरभैर झालेला दिसत आहे. केंद्रातील भाजप सरकार लाखो लोकांना नौकऱ्या देण्याऐवजी जाती-पातीच्या राजकारणावर भर देत आहे. ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे श्री गोरंट्याल यांनी सांगीतले. स्व. गांधी यांनी आधुनिक भारत घडविण्यासाठी देशामध्ये तंत्र विज्ञानाचे जाळे पसरविले नसते तर आपला देश जगाच्या पाठीवर फार मागे पडला असता. म्हणून युवकांनी या आधुनिक युगात स्व. गांधी यांचे विचार अमलता आणणे गरजेचे आहे. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमूद, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वसंत जाधव, जिल्हा सरचिटणीस राम सावंत यांनी स्व. गांधी यांना अभिवादन पर भाषण करतांना सांगीतले की, स्व. गांधी यांचे विचार देशाला प्रगतिशील राष्ट्र बणविन्यासाठी फार महत्वाचे ठरले आहे. देशातील नवतरूणांनी तंत्र विज्ञानामध्ये प्रगती करणे म्हणजेच देशाला जगाच्या पाठीवर नावलौकीक मिळून देणे होय. या प्रसंगी अशोक नावकर, नंदाताई पवार, अजेयभाऊ चव्हाण, फकीरा वाघ, बाबासाहेब सोनवने, सय्यद करीम बिल्डर, अर्जुन राऊत, संतोष माधेवाले, गणेश चांदोडे, गणेश चौधरी, कलिम खान, सय्यद रहिम तांबोळी, अनिल कांबळे, अंकुश चव्हाण, नितिन कानडे, बद्रीनाथ जाधव, अरूण घडलिंग, बापु साळवे, सुरेश बोरूडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकशाहीर आन्नाभाऊ साठे यांच्या स्मारकाची विटंबणा करणाऱ्यांचा तपास लावा; नसता आमरण उपोषण

सुनिल काळुंके यांची विभागीय पोलीस आयुक्तांकडे मागणी

जालना (प्रतिनिधी) : अंबड तालुक्यातील कर्जत या गावी दहा वर्षापासून लोकशाहीर आन्नाभाऊ साठे यांचे स्मारक (पुतळा) असून या स्मारकाची गावातील अज्ञान व्यक्तीने तोडफोड करून विटंबना केली. याबाबत अंबड पोलीसात मागील महिण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, या गुन्ह्याच्या अनुषंगाने राजकीय दबावापोटी पोलीसांनी कुठलाही तपास किंवा कारवाई केलेली नाही. या प्रकरणाची विशेष चौकशी करण्यात यावी अशी मागणी सुनिल काळुंके यांनी विभागीय पोलीस आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.या संदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कर्जत या गावामध्ये शंभर ते दिडशेच्या आसपास समाज हा मातंग आहे. आमचे श्रध्दास्थान असणारे आन्नाभाऊ साठे यांचे ग्रामपंचायतच्या जागेवर स्मारक आहे. गावातील काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी स्मारकाची विटंबना केल त्यामुळे सामाजिक भावना दुखाविल्या. याची फिर्याद अंबड पोलीस स्टेशनला दि. 22 जुलै 2022 रोजी दिली. मात्र, अंबड पोलीसांनी घडलेल्या घटनेचा आजपर्यंत कोणताही योग्य तपास केलेला नाही. राजकीय दबावापोटी हा घडलेला गुन्हा दाबण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्या स्तरावरून या गुन्हयासंदर्भात विशेष पोलीस तपासी पथक गठीत करून या गुन्हयाचा तपास करून महापुरुषाच्या विटंबनेला जबाबदार असलेल्या गुन्हेगाराला योग्य ती शिक्षा देण्यात यावी. या प्रकरणाचा तात्काळ तपास न झाल्यास आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा ईशारा सुनिल काळुंके यांनी या निवेदनाच्या शेवटी दिला आहे.



# ‘ट्रॅकचाईल्ड’ धक्कादायक!

सरासरी रोज तीन मुले बेपत्ता होतात असे ‘ट्रॅकचाईल्ड’या संकेतस्थळावर नमूद आहे. या संकेतस्थळाच्या मदतीने बेपत्ता मुलांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. मानवी तस्करीसाठी या मुलांचा वापर केला जात असल्याची भीती या क्षेत्रात काम करणारे सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करतात.लहान मुलांच्या तस्करीला आळा घालणारा विशेष कायदा अद्यापही तयार झाला नसल्याची खंत नोबेल पारितोषिक विजेते कैलास सत्यार्थी यांनी नुकतीच एका कार्यक्रमात बोलताना व्यक्त केली होती. काही मुले पालकांवर रागावून घर सोडतात असे वृत्त माध्यमात अधूनमधून झळकत असते. पण बेपत्ता झालेली सगळीच मुले रागावून घर सोडत असतील का? गेल्या वर्षभरात साधारणतः 900 मुले हरवली. ते सगळेच घरच्यांवर नाराज असतील का? ज्यांचे मुल हरवते त्यांच्या पालकांवर काय परिस्थिती ओढवत असेल या कल्पनेने सुद्धा मनाचा थरकाप उडतो.हरवलेल्या बालकाचा शोध लागला नाही म्हणून ते पालक त्यांच्या बाळाला कधीतरी विसरु शकतील का? चिमुकल्यांचा शोध घेण्यासाठी ते देखील जीवाचा आटापिटा करतात. बेपत्ता मुलांचा शोध यंत्रणाही घेत असते. काही बेपत्ता मुलांचा शोधही लागतो. मुल हरवल्याची तक्रार योग्य वेळेत दाखल झाली आणि त्या तक्रारीची दखल तातडीने घेऊन वेगाने शोध घेतला गेला तर मुल सापडण्याची शक्यता बळावते.नाशिकमधील एका बेपत्ता मुलीचा शोध चोवीस तासात लावण्यात यंत्रणेला नुकतेच यश आले. नाशिकमध्येच अजुन एक विचित्र आणि कोणाच्याही कल्पनेपलीकडची घटना घडली. समाजातून माणुसकी अजुनही हद्दपार झालेली नाही याचा प्रत्यय त्या घटनेने सर्वांना आणून दिला. बेपत्ता मुलांचा शोध घेणे हे पोलीसांचे कर्तव्यच आहे. तथापि सामान्य माणसांनी संवेदनशीलता दाखवल्याने एक चिमुकली सुखरुप तिच्या घरी परतली. वेळ रात्री नऊ-साडेनऊची होती. दुकानदार आणि व्यावसायिक आपली दुकाने हळूहळू बंद करत होते. एक दुकान बंद करत असताना दुकानातील कामगारांना दुकानाच्या ओट्यावर एक लहान मुलगी रडत बसलेली दिसली. ती कमालीची भेदरलेली होती.कामगारांनी तिला दुकानात नेले. तिची विचारपूस केली तेव्हा ती मुलगी आधाराश्रमातील असल्याचे कळाले. कामगारांनी रात्री सुखरुप तिला आधाराश्रमात पोहोचवले आणि आयुष्यात पुन्हा एकदा निराधार होण्याचा तिच्यावरचा प्रसंग टळला. मुंबईमधील एका बेपत्ता मुलीच्या पालकांनाही पोलीस दलाचा मानवी चेहरा उमजला. त्याचे वृत्त नुकतेच माध्यमात झळकले. नऊ वर्षांपूर्वी म्हणजे 2013 साली एक पालकांची मुलगी हरवली होती. ती परत मिळेल अशी आशाही त्यांनी इतक्या वर्षांनंतर कदाचित सोडून दिली असेल. पण हवालदार राजेंद्र भोसले यांनी मात्र आशा सोडली नव्हती.2015 मध्ये भोसले निवृत्त झाले. पण त्यांनी पुजाचा शोध त्यांच्यापरीने सुरुच ठेवला होता. त्यांच्या शर्टच्या खिशात पुजाचा फोटो कायमच ठेवलेला असायचा. अखेर एक दिवस त्यांची इच्छाशक्ती फळाला आली आणि त्यांना पुजाचा शोध लागला. त्यांच्या अथक प्रयत्नांनी पुजा तब्बल नऊ वर्षांनंतर तिच्या पालकांच्या कुशीत परतली आहे.दुकानातील कर्मचारी आणि पोलीस हवालादारांनी निवृत्तीनंतर सुद्धा दाखवलेली जागरुकता समाजातील प्रत्येकाने दाखवली तर सर्वच प्रकारच्या गुन्ह्यांची उकल काही प्रमाणात तरी सोपी होईल. समाजात चांगलेही घडत असते यावरचा लोकांचा विश्वास वाढेल.

# महाराष्ट्र जलसंधारण जनक,जलक्रांतीचे प्रणेते,पूर्वराज्यपाल,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, गुन्हेगाराचे साम्राज्य उध्वस्त करणारे एकमेव लोकनेते,लोकनायक,सुधाकरराव नाईक

प्रतिनीधीः(जालना)-वेळीच पाण्याचे महत्व ओळखुन उपाययोजना केली नाही तर महाराष्ट्राचे वाळवंट झाल्याशिवाय राहणार नाही!सुधाकरराव नाईक.जलक्रातींचे प्रेणेते सुधाकरराव नाईक साहेबांना जयंती विनंम्र अभिवादन!यवतमाळ जिल्हयातल्या पुसद तालुक्यातल्या गहुली या गावचे सरपंच,मग पुसद पंचायत समितीचे सभापती,यवतमाळ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री,अशी सुधाकररावांची राजकीय कारकीर्द बहरत गेली.सरपंचपद भूषवल्यानं मातीशी असलेल्या नाळेच्या वेदनेची जाण त्यांना होती.महाराष्ट्रातली माती कशाला भुकेजलेली आहे,याचं भान आणि जाण सुधाकररावांना होतं.राज्याच्या शेतीचा प्रश्न,बागायतीचा नसून कोरडवाहूचा आहे,हे लक्षात घेऊनच सुधाकररावांनी त्यासाठी जाणीवपूर्वक जलसंधारणाचा मोठा कार्यक्रम हाती घेतला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी या जलसंवर्धन नावाचं स्वतंत्र खातं निर्माण करून स्वतंत्र मंत्री नियुक्त करून धाडसी कार्यक्रम सुधाकररावांनी प्रभावीपणे राबवलाही.मोठ-मोठी धरणं बांधण्यापेक्षा जलसंधारणाची छोटी आणि मध्यम कामं पूर्ण करून जास्त शेतजमीन सिंचनाखाली येऊ शकते आणि अशा प्रकल्पांमुळे शेतकरी निराधार होत नाही,भूमिहीन होत नाही,पुनर्वसनाचे प्रश्न निर्माण होत नाहीत,हे ओळखण्याचं द्रष्टेपण सुधाकररावांमध्ये होतं,हे त्यांचं सर्वात मोठं यश म्हणून नमूद करायला हवं.मुख्यमंत्रीपद गेल्यावर त्यांची हिमाचलच्या राज्यपालपदी नियुक्त झाली पण,तिथं ते रमले नाहीत आणि परत आल्यावर जलसंधारणाच्या कामात त्या समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अतिशय चिवटपणे या कामांचा पाठपुरावा केला, हे अनेकांना ठाऊक आहे.शेतकऱ्यांचं भलं कशात आहे, हे सुधाकरावांना जास्त चांगलं ठाऊक होतं.फक्त घेतलेल्या निर्णयांचं मार्के टिंग करून स्वतःचं महत्त्व वाढवण्याचा फंडा सुधाकरावांना कधी जमला नाही.अन्यथा, शेतीसाठी घेतलेल्या दहा हजार रुपयापर्यंतच्या कर्जावर दहा टक्के असणारा कर्जाचा दर त्यांनी एका फटक्यात सहा टक्के केला, याचा प्रसिद्धीसाठी खूप मोठा वापर त्यांना करून घेता आला असता. स्थानिक स्वराज्य संस्था अधिक प्रभावी झाल्या पाहिजे, असं वारंवार बोललं जात असे पण, त्यासंदर्भात किमानही कृती राज्यकर्ते करत नसत. सर्वाधिकार मुंबईत केंद्रित ठेवणं राज्यकर्त्यांच्या सर्वच दृष्टीनं सोयीचं होतं. सुधाकररावांनी मात्र जिल्हा परिषदा जास्तीत जास्त कशा बळकट होतील, याकडे जातीनं लक्ष दिलं. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाला राज्यमंत्रीपदाचा दर्जा देऊन प्रशासनातील अधिकाऱ्यांना त्यांचे निर्णय पाळणं बंधनकारक करणं एवढंच नव्हे तर शिष्टाचारानुसार अधिकाऱ्यांपेक्षा या पदाधिकाऱ्यांना वरचा दर्जा मिळवून देणं ही काही तशी साधी बाब नव्हे ती. प्रशासकीय पोलादी यंत्रणेला राजी करून असा निर्णय घेणं आणि तो अमलात आणणं यासाठी राज्यकर्ता म्हणून असायला हवा तो कणखरपणा सुधाकरावांमध्ये होता आणि तो त्यांनी सिद्धही करून दाखवला.

महाराष्ट्राच्या राजकारणात सुधाकररावांचं नाव ठसठशीतपणे नोंदलं जाईल, हे त्यांनी राजकारणातल्या गुन्हेगारीविरुद्ध दिलेल्या कणखर लढयाबद्दल. महाराष्ट्राच्या राजकारणातल्या गुन्हेगारीला महाराष्ट्रातिल सत्ताधारी पक्षातिल एका बड्या नेत्याचा प पाठिंबा आहे, असं जाहीररीत्या तेव्हा बोललं जायचं पण, त्याविरुद्ध कृती मात्र कधीच होत नसे.पत्रकार, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते त्याविषयी खंत व्यक्त करण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हते, ही वस्तुस्थिती होती. सुधाकररावांनी मात्र राजकारणातल्या गुन्हेगारी वृत्तीच्या धनदांडग्यांना चांगलीच वेसण घातली.पप्पु कलानी,अरुण गवळी या सारख्या गुन्हेगारांचे साम्राज्य उध्वस्त केले.

काँग्रेसला अल्पमतात ठेवून आपलं मुख्यमंत्रीपद शाबूत ठेवण्याची एक कसबी शैली शरद पवारांनी विकसित केली होती. अशा राजकीय अस्थितरतेत केवळ शरद पवार यांचंच नेतृत्व अपर्यायी आहे, असं तेव्हा पवारांच्या गोटातून भासवलं जात असे आणि म्हणूनच अन्य पक्षातून काँग्रेसमध्ये येणाऱ्यांना टंगवून ठेवलं जात असे. सुधाकररावांनी मात्र मुख्यमंत्री झाल्यावर पहिल्याच झटक्यात छगन भुजबळांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या दहा आमदारांना तसंच, जनता पक्षातल्या नऊ आमदारांना काँग्रेसमध्ये आणून विधिमंडळात काँग्रेसचं संख्याबळ बहुमताच्या सीमापार नेऊन ठेवलं. व्यक्तीपेक्षा पक्ष मोठा आहे, हीच धारणा त्यांनी त्यातून स्पष्ट करुन पक्षांतर्गत विरोधकांना सणसणीत चपराक दिली..सेना फोडणे त्या काळी वाटते तितके सोपे नव्हते.आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात सुधाकररावजी लोकप्रियतेच्या यशोशिखरावर जाऊन पोहोचले होते. तेरा वर्षापासुन जि.प.व पं.स.च्या निवडणुका घेण्याची हिंमत पराभवाच्या भितीने कांग्रेस पक्ष दाखवित नव्हता.पण सुधाकररावांनी निवडणुकाही घेतल्या आणि स्वतःच्या लोकप्रियतेच्या बळावर राज्यातिल सर्वच्या सर्व जिल्हा परीषदा जिंकुनही दाखविल्या.एक माणूस म्हणून सुधाकरराव अतिशय कणखर होते.गप्पांच्या मैफिली भरवाव्यात, न दाखवलेल्या स्वकर्तृत्वाचे मोठमोठे इमले बांधावेत, चमचांची फौज स्वतःभोवती जमा करावी आणि आरत्या ओवाळून घ्याव्या, असा सुधाकररावांचा स्वभाव नव्हता. ते जे काही बोलत ते अतिशय मोजकं असे आणि त्यामागं एक ठाम धारणा असे. जन्मजात लाभलेली विलक्षण मिश्कील शैली, हे त्यांचं एक वैशिष्टय होतं. बैठकीत किंवा गप्पांमध्ये एखादंच भेदक वाक्य बोलून ते समोरच्यांची बोलती बंद करून टाकत असत. ‘सावज टप्प्यात आल्याशिवाय शिकारी बार टाकत नाही’ हे त्यांचं विधान याच पठडीतलं होतं! कोणाचंही काम करताना त्याची जात, धर्म, राजकीय बांधिलकी सुधाकररावांनी कधी बघितलीच नाही. उजव्या हातानी कोणाला मदत केली ते डाव्या हातालाही कळू दिलं नाही.अल्पशा कारकिर्दीत महाराष्ट्राच्या राजकारण आणि प्रशासनावर कणखर निर्णयांची एक ठाम मुद्रा उमटवणारा मुख्यमंत्री सुधाकररावांच्या रूपानं लाभला होता, हे मात्र शंभर टक्के खरं. त्यांना जर मुख्यमंत्रीपद दीर्घ काळासाठी मिळालं असतं तर महाराष्ट्राचं चित्रं खूपसं वेगळं असतं, यात शंकाच नाही.

जिवन परिचयः

जन्म : 21 ऑगस्ट 1934 (पूसद)

मृत्यू : 10 मे 2001

भूषविलेली अन्य पदे

कृषी, पाटबंधारे, शिक्षण, उद्योग, महसूल, पुनर्वसन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, गृहनिर्माण ही खाती.

1972 ते 1977 या काळात यवतमाळ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष. 1994 मध्ये हिमाचल प्रदेशच्या राज्यपालपदी नियुक्ती.

1998 मध्ये वाशिम मतदारसंघातून लोकसभेवर निवड. अ. भा.काँग्रेसचे सरचिटणीस.

1999 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश. 1999 मध्ये जलसंधारण परिषदेच्या अध्यक्षपदी निवड.

राजकीय वारसदार बंधु मनोहराव नाईक हे मंत्री.

मुख्यमंत्रीपदाचा कालावधीः

25 जून 1991 ते 6 मार्च 1993

पक्ष : काँग्रेस

1977 मध्ये पहिल्यांदा विधान परिषदेवर निवड.

# रक्तदान,प्रदर्शन,व्याख्यानाने छायाचित्रकार दिन साजरा



जालना (प्रतिनिधी): जालना जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशन तर्फे रक्तदान शिबीर, छायाचित्र प्रदर्शन,फोटो ग्राफी व्यवसायातील नवीन तंत्रज्ञान या वर व्याख्यान अशा भरगच्च उपक्रमांनी जागतिक छायाचित्रकार दिन शुक्रवारी ( ता. 19) उत्साह आणि जल्लोषात साजरा करण्यात आला.

मातोश्री लॉन्स येथे महोत्सव समिती तर्फे आयोजित सोहळयास माजी मंत्री, आ. बबनराव लोणीकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर,भानुदासराव घुगे, भाजपाचे शहराध्यक्ष राजेश राऊत, अशोक आण्णा पांगारकर,अभिमन्यू खोतकर, बद्रीनाथ पठाडे,चंद्रकांत धाडवे, मिसेस इंडिया स्पर्धेच्या उपविजेत्या अंजली शर्मा, सिनेअभिनेत्री विदुला बाविस्कर,किरण नवगीरे, अमोल ठाकूर, जालना जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशन चे अध्यक्ष अनिल व्यवहारे, छायाचित्र दिन महोत्सव समिती चे अध्यक्ष मधुसूदन दंडारे, उपाध्यक्ष मोहन मिटकरी, सचिव रवी धांडे, शाम सकुंडे, वसंत चौधरी, ज्ञानेश्वर गिराम, श्याम गिराम, सोनाजी नन्नवरे, राजेश खर्डेकर, लक्ष्मीकांत नारळे, राजेश कंठाळे, गौतम वाघमारे, मकसूद नाज, आर के समद, विष्णू जाधव, विष्णू नेवरे, सिताराम मुजमुले, भरत मोहिते, भोजराज मेरूकर यांची उपस्थिती होती.

आ. लोणीकर यांनी राजकारण्यांसह सर्व सामान्यांच्या जीवनात छायाचित्रकारांचे अनन्यसाधारण महत्त्व असून आर्ट गॅलरी साठी आपण सहकार्य करणार असल्याची ग्वाही दिली.

Printed, Published And Owned By NAJAKAT SHOUKAT SAYYED. Printed At Vishwa Prakashan Printers ,Aurangabad -jalna Highway Road Badnapur Dist Jalna - 431202 (Maharashtra)).Published from Near Police Station Badnapur Tq.Badnapur Dist Jalna -431202 (Maharastra) Editor- PARVEEN NAJAKAT SAYYED* (*Responsible As Per PR&B Act 1867 And Other Indian Law Related To Newspaper) RNI.REGD.NO.MAHMAR/2013/51856 (124411).(Tital code MAHMAR43151) Contact Us: 9923307786,9421947786 Email:- gaavmat@gmail.com/najakat7@gmail.com

# माजी पंतप्रधान स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या सहवासात घालवलेले ते अमुल्य क्षण आजही आठवतात

## केंद्रीय राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांचे माजी पंतप्रधान स्व.अटलबिहारी वाजपेयी यांना अभिवादन प्रसंगी प्रतीपादन

जालना प्रतिनिधीः- भारतरत्न माजी पंतप्रधान श्रध्देय अटलबिहारी वाजपेयी यांच्या सहवासात मी शालेय शिक्षण घेत असतांना इयत्ता 8 वी मध्ये असतांना पासून होतो त्यांच्या सहवासात घालवलेले ते अमुल्यक्षण आज ही मला आठवत असून स्व.वाजपेयी यांच्या परीश्रमामुळेच भाजपा हे आजही केंद्रात सत्तेत असून कॉंग्रेस हा एका परीवाराचा पक्ष तर भाजपा हा कार्यकर्त्याचा पक्ष असल्याचे मत केंद्रीय रेल्वे कोळसा खाण राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांनी भाजपा जिल्हा जालना कार्यालयात स्व.माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करतांना भाजपा पदाधिकाऱ्यांना प्रतिपादन केले.माजी पंतप्रधान भारतरत्न श्रध्देय अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज जालना येथे भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना कार्यालयात केंद्रीय रेल्वे कोळसा खाण राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांनी विनम्र अभिवादन केले.




यावेळी आ.नारायण कुचे, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य रामेश्वर पाटील भांदरगे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष भास्कर (आबा) दानवे, शहराध्यक्ष राजेश राऊत, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अशोक पांगारकर, बद्रीनाथ पठाडे,प्रदेश महिला चिटणीस सौ.संध्याताई देठे,जिल्हा संघठन सरचिटणीस सिध्दीविनायक मुळे, अवधुत खडके, अतिक खान, जिल्हा उपाध्यक्ष बाबुराव खरात,वसंतराव जगताप, धनराज काबलिये,चंपालाल भगत,पांडूरंग पोहेकर, सतिष जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष कपील दहेकर,भाजपा जिल्हा प्रसिध्दीप्रमुख बाबासाहेब पाटील कोलते,जिल्हा चिटणीस स्नेहा जोशी, युवा मोर्चा शहराध्यक्ष सुनिल खरे,तालुकाध्यक्ष शिवाजीराव बोबडे, तालुका अध्यक्ष वसंतराव शिंदे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष संजय डोंगरे, नगरसेवक शशीकांत घुगे, महेश निकम, सुनिल राठी, सुनिल पवार, डॉ.श्रीमंत मिसाळ,जिल्हा चिटणीस अमोल कारंजेकर,ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सुभाष सले, जिल्हा चिटणीस सोपान पेंढारकर, विष्णु चंद,सुभाष बोडखे, शिवराज जाधव,शहर उपाध्यक्ष राजेंद्र भोसले, बबनराव सिरसाठ,सुरेश कदम, बद्री वाघ आदीसह पदाधिकारी उपस्थीत होते.

यावेळी बोलतांना ना.दानवे म्हणाले की, मी स्व.अटलजी यांच्या बरोबर शालेय जिवनापासून इयत्ता 8 वी वर्गात शिक्षण घेत असतांना पासून होतो मी त्यावेळेस सोलापूरला अटलजीची सभा असतांना एस.टी.बसने सभा ऐकण्यासाठी गेलो होतो परंतु सोलापुरहून परत जालना येण्यासाठी एस.टी.बस नसतांना मी सोलापूरलाच सभेच्या मंडप मध्ये मुक्काम करुन दुसऱ्या दिवशी जालना येथे आलो मला भाजपा नेते स्व.प्रमोदजी महाजन यांनी अटलजीची भेट घालून पहिल्यांदा लोकसभा निवडणुक लढवायला लावली त्यामुळे भाजपाने मला लोकसभेची पाच वेळेस उमेदवारी दिल्यामुळे मी आज केंद्रात रेल्वे राज्यमंत्री मंत्री आहे ते पहील्यांदा मला अटलजीनी लोकसभेची उमेदवारी दिल्यामुळेच त्यामुळे भाजपा कार्यकर्त्यांनी व पदाधिकारी यांनी पदाच्या मागे न लागता पक्षाचे काम करुन सामान्य जनतेचे काम करण्याचे आवाहन केले पुढे ना.दानवे बोलतांना म्हणाले की, मी आतापर्यंत 25 निवडणुक लढलो त्यापैकी 24 निवडणुका जिंकलो असून मला भाजपामध्ये केंद्रीय रेल्वे कोळसा खाण राज्यमंत्री पदाची जबाबदारी घेण्यासाठी 42 वर्षे लागली त्यामुळे भाजपाचे जुने कार्यकर्ते हे भारतीय जनता पार्टीचा पाया असून भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पदाचा उपयोग भारतीय जनता पार्टीसाठी करावा आज रोजी कॉंग्रेस पक्ष गरीब झाला असून त्यांचा नेताच श्रीमंत झाला आहे अशी कॉंग्रेस पक्षाची अवस्था असून कॉंग्रेस पक्ष हा एका परीवाराचा पक्ष तर भाजपा कार्यकर्त्याचा पक्ष हे समीकरण आजही भाजपामध्ये स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्यामुळे असल्याचे मत केंद्रीय मंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांनी यावेळी व्यक्त करुन ना.दानवे म्हणाले की, अटलजीच्या सहवासात घालवलेले ते अमुल्य क्षण आजही पदोपदी प्रेरणा देत असतात जगायला मोठे बळ देत असतात, अटलजीच्या लेखणीतुन प्रेरणा घेण्यासाठी कवीता,भाषणे,लेख,पुस्तक वाचण्याचे सर्वांना आवाहन यावेळी केंद्रीय राज्यमंत्री ना.दानवे यांनी केले.

## जलजीवन मिशन अंतर्गत गोंदेगाव पाणीपुरवठा योजनेसाठी लक्ष 1 कोटी 18 लाख मंजूर-वाघ


केंद्रीय राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नाने केंद्र शासन पुरस्कृत जलजीवन मिशन अंतर्गत मौजे गोंदेगाव येथील पाणीपुरवठा योजनेसाठी 1 कोटी 18 लाख निधी मंजूर झाला, लवकरच प्रत्यक्षात कामे चालू होईल, अशी माहिती गोंदेगावचे रहिवासी तथा भाजपा तालूका सरचिटणीस बद्रीनाथ श्रीपत वाघ यांनी दिली आहे.



जलजीवन मिशन अंतर्गत गावातील सर्व कुटुंबाना सन 2024 पर्यंत हर घर नल से जल याप्रमाणे पाणीपुरवठा योजना होणार आहे. सन 2024 पर्यंत संपूर्ण गावातील प्रत्येक घरातील वैयक्तिक नळ जोडणीद्वारे मानसी 55 लिटर प्रतिदिनी गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करणे हे जलजीवन मिशनचे प्रमुख उदिष्ट आहे. या योजने अंतर्गत गावातील प्रत्येक व्यक्तीला स्वयंपाकासाठी आणि घरगुती वापरासाठी शुद्ध व पुरेसा आणि शाश्वत पाणीपुरवठा सर्वकाळ आणि सर्व परीस्थित्त उपलब्ध होणार असल्याचे बद्रीनाथ वाघ यांनी सांगितले व त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे, भाजपा जिल्हाध्यक्ष आ.संतोष पाटील दानवे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष भास्कर (आबा) दानवे यांचे गावाच्या वतीने आभार व्यक्त केले.

## जालना जिल्हा कॉंग्रेस सेवा दलाच्या वतीने स्व.राजीव गांधी जयंती निमित्त कदीम जालना पोलीस ठाणे परिसरात वृक्षारोपण

औरंगाबाद-कॉंग्रेस सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री लालजी देसाई व प्रदेशाध्यक्ष श्री विलास औताडे यांच्या आदेशानुसार माजी पंतप्रधान तथा भारतरत्न स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त दि.20 आ?गस्ट रोजी जालना जिल्हा कॉंग्रेस सेवा दलाच्या वतीने स्व. राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच कदीम जालना पोलीस ठाण्याच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. कदीम जालना पोलीस ठाण्याचे श्री सोनवणे यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी कॉंग्रेस सेवा दलाचे जिल्हा कार्याध्यक्ष अब्दुल रफिक सर यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, स्व. राजीव गांधी यांनी युवकांना अठरा वर्षाच्या वयात मतदान करण्याचा अधिकार दिला, तसेच तंत्रशिक्षणाचे द्वार उघडले, पहिल्यांदा संगणक परिचार देशाला राजीव गांधी यांनी दिला. देशात नवोदय विद्यालयाची स्थापना करून युवा पिढींना नवीन ऊर्जा दिली. तसेच देशासाठी आपले बलिदान दिले हे आम्ही कधीही विसरणार नाही. सदरील कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक घोडे, कॉंग्रेस सेवा दलाचे जिल्हा उपाध्यक्ष शेख इर्शाद, महिला शहराध्यक्ष श्रीमती संगीता कांबळे, महिला उपाध्यक्ष सौ. संगीता डोंगरे, कुहाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.




## जिल्हाधिकारी कार्यालयात स्व.राजीव गांधी यांना आभिवादन

जालना, :- देशाचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी रवींद्र परळीकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आभिवादन केले.तसेच सद्भावना दिनाची उपस्थितांना प्रतिज्ञा देण्यात आली.यावेळी उपजिल्हाधिकारी शर्मिला भोसले, उपजिल्हाधिकारी गणेश निहाळी, तहसीलदार संतोष गोरड,तहसीलदार प्रशांत पडघन,संजय चंदन,याया पठाण यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## गाय पाळल्याने ईश्वर सेवा घडते-पं.विशाल महाराज त्रिवेदी

जालना /प्रतिनिधीजालना शहरातील बालाजी नगर येथील बालाजी मंदिरात श्रावण मासानिमित्त बालाजी मंदिर ट्रस्ट तर्फे पं. विशाल महाराज मनोज त्रिवेदी यांच्या सुमधुर वाणीत श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले या भागवत कथेत श्री कृष्ण जन्माष्टमी निमित्त श्री कृष्ण जन्म अति उत्साहात साजरा करण्यात आला आहे.यात भक्त लीन होऊन राधे कृष्ण च्या गजराने परिसर दुमदुमले होते.या गीतेत श्री कृष्णाने जसे मथुरेला झालेल्या चक्रीवदळाने वाचविण्यासाठी गोवर्धन पर्वत उचलले होते.यात गायींचे रक्षण करणारे श्री कृष्ण आहेत.यासाठी गायीच्या सेवेतच ईश्वर सेवा असल्याचे पं. विशाल महाराज त्रिवेदी यांनी सांगितले.पुढे बोलताना म्हणाले की, जो गायीची सेवा करतो त्याला श्री कृष्ण ची सेवा केल्याप्रमाणेच आहे.घरात कुत्रे पाळण्या ऐवजी गायी पाळावे कुत्र्या ऐवजी गायीची सेवा केल्याने ईश्वर सेवा केल्या सारखे असल्याचे श्री पं विशाल महाराज त्रिवेदी यांनी म्हटले आहे.आई वडिलांची सेवा केल्याने मोक्षला प्राप्ती होते या भागवत कथेत श्रीकृष्ण जन्म उत्सव साजरा करण्यात आला असून या उत्सवात भाविकांनी मोठी गर्दी उपस्थित होते.



## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा निरंतर लाभ मिळण्यासाठी ई-केवायसी आवश्यक

जालना :- जिल्ह्यातील सर्व प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न असलेल्या बॅंक खात्यामध्ये अनुदान वितरीत करण्यास प्रारंभ झालेला आहे. ज्या लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची ई- केवायसीची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांचा पुढील हप्ता बॅंक खात्यामध्ये जमा होणार नाही. सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑगस्ट 2022 पासून योजनेच्या पुढील लाभाचे हप्ते निरंतर मिळण्याकरीता ई- केवायसीची प्रक्रिया बंधनकारक करण्यात आलेली आहे. याकरीता प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) एे://ज्र्स्ैह.ुदन.ग्ह या वेबसाईटवरील इर्दैसे ण्देही या टॅबमध्ये किंवा पी.एम. किसान ?पद्वारे ओटीपी आधारे लाभार्थ्यांना स्वतः ई - केवायसी प्रमाणीकरण मोफत करता येईल. ग्राहक सेवा केंद्र (सीएससी) केंद्रावर ई-केवायसी प्रमाणीकरण बायोमॅट्रिक पध्दतीने करता येईल. केंद्र शासनाकडून ग्राहक सेवा केंद्र (सीएससी) केंद्रावर बायोमॅट्रिक पध्दतीने ई-केवायसी प्रमाणीकरण करण्यासाठी प्रती लाभार्थी प्रती बायोमॅट्रिक प्रमाणीकरण दर शासनामार्फत रुपये 15/- फक्त निश्चित करण्यात आला आहे. पी.एम. किसान योजनेअंतर्गत सर्व पात्र लाभार्थ्यांना पुढील ऑगस्ट -नोव्हेंबर 2022 या कालावधीची लाभ प्राप्त होण्यापुर्वी ई-केवायसी प्रमाणीकरण प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली असुन दि. 31 ऑगस्ट 2022 अखेरपर्यंत ही प्रक्रीया पूर्ण करण्यात यावी.

# अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीची विश्वास आरोटे यांना डॉक्टरेट पदवी

दिल्ली(प्रतिनिधी)-अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या वतीने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस विश?वास आरोटे यांना पत्रकारीता, संघटन आणि सामाजिक कार्यासाठी डॉक्टरेट पदवी युनिव्हर्सिटीचे चान्सलर डॉ.सॅंग ओन पार्क यांच्या हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत दिल्ली येथे एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आली. गरीब कुटुंबात जन्म झाल्याने सुरुवातीला मिळेल ते काम करत, वृत्तपत्र वाटप करुन शिक्षण घेऊन पत्रकारीता क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला. पत्रकार संघटनेच्या माध्यमातून राज्यभरातील विस्थापित पत्रकारांचे संघटन करुन त्यांच्या न्याय हक्कासाठी विश?वास आरोटे यांनी वीस वर्षांपासून चालवलेल्या प्रयत्नाची अमेरिकेतील नामांकित विद्यापीठाने दखल घेऊन त्यांचा गौरव केला आहे.

दिल्ली येथे 14 ऑगस्ट रोजी अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या वतीने भारतामधील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या चोवीस लोकांना डॉक्टरेट पदवी देऊन अमेरिकेच्या युनिव्हर्सिटीने सन्मानित केले. यात महाराष्ट्र राज्य मराठी

## पत्रकारांचे संघटन आणि सामाजिक कार्याचा गौरव

पत्रकार संघाचे सरचिटणीस विश?वास आरोटे यांचा सन्मान करण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील विठे (ता.अकोले) येथे गरीब कुटुंबात जन्मलेल्या विश?वास यांनी जन्मगावातच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर राजूर येथून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने मिळेल ते काम करत शिक्षण पूर्ण केले. सुरुवातीच्या काळात दारोदारी वृत्तपत्र विकून त्यांनी गुजरान केली. त्यातुनच वृत्तपत्र क्षेत्राशी नाळ जोडली गेली. एक रुपयाही भांडवल नसताना वृत्तपत्र सुरू करुन त्यांनी उत्तर महाराष्ट्रात आपली ओळख निर्माण केली. पत्रकारीता करत असतानाच शहरी, ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांना मदतीचा हात देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून राज्यभरातील पत्रकार व वृत्तपत्राशी संबंधित श्रमिकांचे मजबुत संघटन उभा केले. वीस वर्षपेक्षा अधिक काळापासून पत्रकार संघटनेच्या व्यासपीठावरुन त्यांनी पत्रकारांच्या समस्या आणि वृत्तपत्रांचे प्रश?न सरकार दरबारी मांडून सोडवण्यासाठी संघर्ष केला आहे. पत्रकारांना अडचणीच्या काळात मदतीला धावून जात पत्रकारांमध्ये एक विश?वासाचे नाते निर्माण केले आहे. तर पत्रकार संघटनेच्या माध्यमातून राज्यभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून पत्रकार संघटनेला त्यांनी सामाजिक सेवेचा चेहरा दिला आहे. कोरोना काळात राज्यभर पत्रकारांना आणि अडचणीतील लोकांना किराणा कीटपासून ते रुग्णवाहिका, औषधोपचार यासाठी मदतीचा यज्ञच चालवला. दुर्दैवाने मृत्युमुखी पडलेल्या पत्रकारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतीचा हात दिला. या कार्याची अमेरिकेतील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीने दखल घेऊन त्यांचा गौरव केला. त्याबद्दल पत्रकारांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.



सहकाऱ्यांच्याच कामाचा गौरव-विश?वास आरोटे

पत्रकारीता करत असताना स्व. मुरलीधर बाबा शिंगोटे यांचा संपर्क आला आणि त्यांच्या सहवासाने या क्षेत्रात काम करण्याची ऊर्जा निर्माण झाली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे आणि प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्यामुळे पत्रकारांचे प्रश?न सोडवण्यासाठी सामान्य पत्रकारांपर्यंत पोहचता आले. पत्रकार संघटनेतील पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळेच आणि त्यांच्या कामामुळेच चांगले काम होत आहे. त्यामुळे अमेरिका युनिव्हर्सिटीने डॉक्टरेट देऊन माझा गौरव केला असला तरी हा सहकाऱ्यांच्याच कामाचा गौरव आहे अशी भावना विश?वास आरोटे यांनी व्यक्त केली.



जालना (प्रतिनिधीः- जालना जिल्हा श्री गणेश महासंघाच्या अध्यक्षपदी श्री.अमोल धानुरे यांची निवड झाली असून त्यांचे स्वागत जालना येथील भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालयामध्ये करतांना भाजपा जिल्हा संघठन सरचिटणीस श्री.सिध्दीविनायक मुळे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे,युवा मोर्चा शहराध्यक्ष सुनिल खरे, डोंगरसिंग साबळे,गणेशराव वाघमारे,नानासाहेब देवडे, कृष्णा गायके,आनंद झारखंडे, विठ्ठल नरवडे, अशोक जाधव, शर्मिष्ठा कुलकर्णी, ओम कळकुंबे, अर्थव कुलकर्णी, संदीप चव्हाण यांच्यासह पदाधिकारी दिसत आहे.

## पीकविम्याची रक्कम मिळण्यासाठी ई-पीक पहाणीमध्ये नोंद करणे बंधनकारक शेतकऱ्यांनी ई-पीक पहाणीमध्ये नोंद करावी-जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड

जालना,:- खरीप हंगामातील पेरणी झालेल्या पिकांची ई-पीक पाहणी कार्यक्रम जिल्ह्यात 1 ऑगस्ट, 2022 पासुन सुरू झाला आहे. पिकांच्या नुकसानीपोटी पीकविम्याची रक्कम मिळण्यासाठी ई-पीक पहाणीमध्ये नोंद करणे बंधनकारक असुन चालु खरीप हंगामातील पिकांची नोंद शेतकऱ्यांनी ई-पीक पहाणीमध्ये करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी केले आहे.

ई-पीक पहाणीमध्ये नोंदीसाठी ई पीक पहाणी मोबाईल ॲप व्हर्जन-2 नव्याने या ॲपची निर्मिती करण्यात आली असुन शेतकऱ्यांनी मोबाईल ॲपमध्ये नोंदविलेल्या पीक पाहणीमध्ये 48 तासांच्या आत दुरुस्ती करता येणे शक्य होणार आहे. याशिवाय हमीभावाने नाफेडमध्ये पिकाच्या विक्रीसाठी नोंदविल्याची सुविधादेखील यंदा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नाफेड केंद्रांवर ऑनलाईन नोंदणीसाठी ताटकळण्याची गरज राहणार नाही.

खातेदारांना त्यांच्या गावातील संपूर्ण पीक पाहणी नोंद पाहण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. यापूर्वी मुख्य पीक व दोन दुय्यम पिकाची नोंद करता येत होती. या हगामापासून एक मुख्य पीक व तीन दुय्यम पिकांच्या नोंदीची सुविधा आहे. याशिवाय खातेदारांना पीक पाहणीमध्ये दुरुस्ती करायची झाल्यास तलाठ्याकडे अर्ज करणे शक्य होणार आहे.

शेतकऱ्यांनी त्यांच्या मोबाईलमधील जुने ?प डिलीट करुन https://played.google.com/store/apps/tails?id=io.sced.eppCordova या लिंकद्वारे गुगल प्ले स्टोअरवर जाऊन ई पीक पहाणी मोबाईल ?प व्हर्जन-2 हे नवीन ॲप आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करुन आपल्या शेतातील पिकाची नोंद शेतकऱ्यांना स्वतः शेतामध्ये जाऊन करण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी केले आहे.

## शालेय अवस्थेतच विद्यार्थ्यांनी वाहतुक नियमाचे धडे घेतले तर अपघाताचे प्रमाण कमी होईल-न्यायधीश अहिर यांचे प्रतिपादन





जालना -आजचे विद्यार्थी हे उद्याचे वाहन चालक असतात. त्यांना उद्या रस्त्यावर येऊन वाहन चालवायचे असते, प्रत्येकांना कोणते ना कोणते वाहन चालवावेच लागते. वाहतुकीचे नियम माहिती नसल्याने अनेक अपघात होत असतात. त्यात अनेकांचे जिव जातात. त्यामुळे विद्यार्थी दशेत असतांनाच त्यांना जर वाहतुक नियमाचे धडे दिले तर भविष्यात अपघाताचे प्रमाण कमी होईल. असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे सचिव न्यायधीश आर. आर. अहिर यांनी केले.

जालना शहरातील आझाद मैदान येथे दि. 20 ऑगस्ट 2022 रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, भागीरथी मोटार ड्रायव्हींग स्कुल आणि जय भारत सेवाभावी संस्थेच्या वतीने वाहतुकीचे नियम, अ?सिड हल्ला आणि व्यसनमुक्ती या विषयावर जनजागृती शिबीर घेण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भागीरथी ड्रायव्हींग स्कुलचे संचालक विकास काळे, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण पवार, पत्रकार अच्युत मोरे, पवार कोचिंग क्लासेसचे संचालक मोहन पवार, श्री. धांडे व जय भारत पदाधीकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना न्यायधीश आर.आर. अहिर म्हणाले की, कोविड मुळे मृत्यु झालेल्या लोकांचा आकडा आपल्याला रोज कळायचा, त्यामुळे धास्ती वाढली होती, परंतु, रोड अपघातात रोज बळी जातात, त्याकडे सुध्दा आपण गांभीर्याने पहाला हवे, हेच रोड अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहतुकीच्या नियमाची जनजागृती महत्वाची असून प्रत्येकानी वाहतुकीचे नियम समजून घ्यावेत आणि विद्यार्थ्यांनी आतापासूनच या नियमाचे धडे घ्यायला सुरुवात करावी असे आवाहन देखील त्यांनी केले. यावेळी एकतर्फी प्रेमातून किंवा हेवे-दावे यातून होणारे अ?सीड अ?टॅक होऊ नये यासाठी काळजी घ्यावी, अ?सीडमुळे कुणाचे तरी आयुष्य बरबाद होते, राग हा क्षणीक असतो, परंतु, अ?सीड अ?टॅकमुळे जिवनभर त्रास भोगावा लागतो, त्यामुळे अ?सीड अ?टॅक कुणीही करु नये, जर कदाचित कुणी अ?सीड अ?टॅक केलाच तर त्याला कोणत्याही रुग्णालयात मोफत उपचार केले जातात, मुलगा असो की, मुलगी असो असो कोणताही भेद केला जात नाही. सर्व जातीधर्माच्या आणि अ?सिड अ?टॅक झालेल्या मुला-मुलींना मोफत उपचार करण्याची तरतुदद करण्यात आली असून असा हल्ला करणाऱ्यांना गंभीर शिक्षेची तरतुद करण्यात आली असल्याचेही न्यायधीश आर.आर. अहिर यांनी सांगीतले.

यावेळी व्यसनमुक्ती करण्यासाठी देखील विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, विद्यार्थ्यांनी आपापल्या पध्दतीने व्यसन करणाऱ्यांना रोखावे, तसेच विद्यार्थ्यांनी कोणतेही व्यसन करु नये, आंमली पदार्थ हे शरीरासाठी अपायकारक असतात, त्यामुळे आपला मृत्यु देखील अटळ आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही स्वरुपाचे व्यसन करु नये असे आवाहन देखील न्या. आर.आर. अहिर यांनी केले.

## स्वातंत्र्य सैनिकाच्या वारसाना निवृत्तीवेतन मंजूर करुन नौकरीविषयक आरक्षण पुर्वीप्रमाणे दया

### स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीचे प्रदेशाध्यक्ष कोलते यांची मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी

जालना (प्रतिनिधी):- महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसाना निवृत्तीवेतन वारसाने मंजूर करुन? 1991 च्या शासन निर्णयाप्रमाणे पुर्वीप्रमाणे नौकरीविषयक आरक्षण देण्याची मागणी स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब कोलते यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उप मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हटले की, महाराष्ट्रातील अनेक स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी आता वयोवृध्दपणे थकले आहे राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र सरकार प्रमाणे निवृत्ती वेतन मिळावे म्हणून या पुर्वी अनेक वेळा शासन दरबारी निवेदन सादर करण्यात आले असून परंतु आदयापर्यंत स्वातंत्र्य सैनिक व वारसाच्या मागण्या राज्य शासनाने मान्य केलेले नाही तसेच राज्य व केंद्रसरकारचे स्वातंत्र्य सैनिक मयत झाल्यानंतर त्यांना मिळणारे निवृत्ती वेतन शासनाने नियमानुसार बंद केले आहे. ते बंद केलेले निवृत्तीवेतन वारस मुला मुलींना तात्काळ मंजूर करावे व स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशीत व्यक्तींना शासन सेवेत नौकरी विषयक सवलतीसाठी असणारा शासन निर्णय दिनांक 25 सप्टेंबर 2020 शासन निर्णय तात्काळ रद्द करुन पुर्वीप्रमाणे स्वातंत्र्य सैनिकांच्या एका नामनिर्देशीत पाल्यांना नौकरीविषयक सवलत पुर्वीप्रमाणे कायम ठेवून पुर्वीप्रमाणे नामनिर्देशनपत्र देण्यात येवून नौकरीविषयक सवलत 1991 च्या शासन नियमाप्रमाणे प्रमाणे देण्यात यावी.

परंतु मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची नव्या पिढीला आठवण राहावी व थोर स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास हा त्यांच्या वारस मुला मुलींना कळावा त्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटूंबातील एका वारसांना निवृत्तीवेतन वारसाने मंजूर करण्यात यावे, तसेच स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशीत पाल्यांना तात्काळ शासन सेवेत समावून घेण्यात यावे व नौकरी विषयक सवलतीचे नामनिर्देशन पत्र रद्य न करता पुर्वीप्रमाणे कायम ठेवावे, शासन सेवेत असलेल्या स्वातंत्र्य सैनिकाच्या नामनिर्देशीत पाल्यांना पद्योन्नोती देण्यात यावी आदीसह मागण्या तात्काळ मंजूर न केल्यास 17 सप्टेंबर 2022 रोजी स्वातंत्र्य सैनिक व पाल्य तीव्र आंदोलन करणार आहे अशी मागणी बाबासाहेब कोलते यांनी केली आहे.

## तालुकास्तरावरील महिला लोकशाही दिनाचे 22 ऑगस्टला आयोजन

जालना,:- महिला व बाल विकास विभागामार्फत समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्याकरीता त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याच्या चौथ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

त्यानुसार सोमवार, दि. 22 ऑगस्ट 2022 रोजी सकाळी 11.00 ते 12.00 वाजेपर्यंत तहसिल कार्यालय, परतूर व बदनापूर येथे महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणा-या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतीत तालुका महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय येथे दाखल करण्याचे आवाहन केले आहे.

अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे - तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही. शासन निर्णयाप्रमाणे महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी.


**हरवले**

शेख सैफ बिलाल या नावाची बारावी पास ची मूळ टी सी व इतर कागदपत्रे प्रवासा दरम्यान हरवले आहे,सापडल्यास खलील पत्त्यावर आणून द्यावे ही विंनती.

**शेख सैफ बिलाल**
भगवान नगर गेवराई जिल्हा बीड
मोबाईल नंबर 918180001207